महाराष्ट्र शासन
मत्स्यव्यवसाय विभाग
आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
सी-२४, दुसरा मजला, मित्तल टॉवर,सी विंग, नरिमन पॉइंट, विधानभवन जवळ,
मुंबई ४०० ०२१

Website: http// fisheries.maharashtra.gov.in Email : commfishmaha@gmail.com

जा.क्र. मत्स्य/प्रशा/१५३१०२/१८१/२०२५ दिनांक:- /०७/२०२५

**कार्यालयीन आदेश :-**

वाचा :- १. शा. नि., सा.प्र.वि., क्र.अकंपा-१२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि.२१.०९.२०१७.
२. शा. नि., सा.प्र.वि., क्र.अकंपा-१२९९/प्र.क्र.५६/आठ, दि.१०.०६.२०१९ व दिनांक ११.०९.२०१९
३. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. अकंपा-१२२५/प्र.क्र.१२१/म.लो.आ., दि.१७.०७.२०२५
४. सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. अकंपा-१२२५/प्र.क्र.१९४/म.लो.आ., दि.२२.०८.२०२५
५. सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. अकंपा-१२२५/प्र.क्र.१९४/म.लो.आ., दि.११.०९.२०२५
६. शासन निर्णय पदुम क्र. मत्स्यआ २०२६/ प्र.क्र.१२०/ पदुम-१२, दि.२७.०७.२०२६

**प्रस्तावना:-**

श्री.कौशिक एस. परटके यांनी मुळ अर्ज क्रमांक १२८७/२०२३ अन्वये महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ नागपूर यांच्याकडे अनुकंपा या पदावर नियुक्ती मिळणेबाबत याचिका दाखल केली होती. सदर याचिकेचा निकाल दि.२६.११.२०२४ रोजी लागला असून मा. महाराष्ट्र न्यायाधिकरण, खंडपीठ नागपूर यांनी खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

"Heard learned P.O. Shri S.A. Sainis. He has strongly objected the O.A. on the ground that the substitution is not provided as per the G.R. dated २०/०५/२०१५. As per the Judgment of Hon'ble Bombay High Court Bench at Aurangabad in the case of Dnyaneshwar S/o Ramkishna Musane Vs. State of Maharashtra & Others (cited supra), the specific directions were given to the Government of Maharashtra to delete the unreasonable restrictions imposed by G.R. dated २०.०५.२०१५. "

उपरोक्त निकालामध्ये नमूद केल्यानुसार अशा स्वरुपाचा बदल सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयात केल्याचे दिसून येत नाही. सदर मूळ याचिका क्र-१२८७/ २०२३ प्रकरणी दि.२६.११.२०२४ च्या निकालामध्ये खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत.

(i) The O.A. is allowed.
(ii) The impugned order dated १६/०६/२०२२ issued by respondent No.४ is hereby quashed and set aside.

(iii) The respondents are directed to enter the name of applicant in the waiting seniority list and provide the employment on compassionate ground as per rules and policy of the Government.

(iv) No order as to costs.

मा. महाराष्ट्र न्यायाधिकरण, नागपूर खंडपीठाने मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर खंडपीठाने मूळ अर्ज क्र.१२८७/२०२३ (श्री. कौशिक एस. परटके विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर) मध्ये दिलेला आदेश योग्य आहे. त्यामुळे हा "खटला आव्हान देण्यासाठी योग्य नाही" असे शासनाच्या विधी व न्याय विभागाने शासनास (पदुम-१२) दिलेल्या अभिप्रायाच्या अनुषंगाने श्री.कौशिक सु. परटक्के यांचे नाव अनुकंपा प्रतिक्षायादीमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.

शासनाने संदर्भांकित दि.२७.०७.२०२६ अन्वये सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, वर्धा कार्यालयातील गट-ड मधील मृत घोषित केलेले ०१ शिपाई पद अनुकंपा नियुक्तीसाठी नियमित पद म्हणून पुनर्जिवित करण्यात याव्दारे मान्यता दिली आहे.

**आदेश :-**

मत्स्यव्यवसाय विभागातील महाराष्ट्र मत्स्यसेवा गट-ड, अंतर्गत निर्यामत आस्थापनेवरील सरळसेवेची शिपाई या संवर्गातील सन २०२५ मधील रिक्त पदे अनुकंपा तत्वावर भरुन काढण्यासाठी खालील उमेदवार शिपाई या पदावर (वेतनश्रेणी सुधारीत वेतनस्तर S-१ १५०००-४७६००) मध्ये खालील अटी व शर्तीच्या अधिनस्त राहून त्यांचे नावासमोर रकाना क्र. ०५ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येत आहे.

| क्र. | अनुकंपाधारकाचे नाव | प्रवर्ग | कर्मचाऱ्यांचे नियुक्तीचे पद | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. कौशिक सुरेश परटक्के | इमाव | शिपाई | सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, कार्यालय वर्धा |

**सेवा शर्ती महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ (सेवेच्या सर्वधारण शती) व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाच्या तरतूदीनुसार राहतील.**

## नियुक्तीच्या अटी व शर्ती

१. सदर नेमणुक ही पुर्णतः तात्पुरत्या स्वरुपाची असून कोणतीही पूर्वसूचना न देता किंवा कोणतेही कारण न दर्शविता कर्मचाऱ्याला कामावरुन काढून टाकण्याचा अधिकार नियुक्ती अधिकारी यांचा आहे.

२. कामावर रुजू झाल्यापासून दोन महिन्याच्या आत पोलिस विभागाकडून चारित्र्य व वर्तुणुकीबाबत तपासणी अहवाल मागविण्यात येईल, सदर अहवाल समाधानकारक आवश्यक आहे. असा अहवाल असमाधानकारक आढळल्यास आपली सेवा शा.नि. सा.प्र.वि. परि, चापअ २०१२/प्र.क्र६३/१६-अ. दि. २६.०८.२०१४ नुसार तात्काळ काहीही कारण न दर्शविता सेवा समाप्त करण्यांत येईल.

३. नियुक्तीचे पदावर हजर झाल्यांनतर ते शासनाची सेवा करण्यास शारिरिक दृष्ट्या पात्र असल्याचे प्रमाणपत्र सक्षम वैद्यकिय प्राधिकाऱ्याकडून प्राप्त करुन घेवून ते तीन महिन्यांच्या आत नियुक्ती कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक वशिअ १२१४/प्र.क्र./२६/११, मंत्रालय, मुंबई दिनांक ०२ जून २०१४ च्या अनुषंगाने आपल्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन महिन्याच्या कालावधीत स्वतःची मत्ता व दायित्व वाबद्दलची विवरणपत्रे कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

५. मराठी भाषा व हिंदी भाषा १०० गुणांचा विषय घेऊन माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उतीर्ण नसल्यास एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परिक्षा उतीर्ण करावी लागेल.

६. उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे क्रिमिलिअर प्रमाणपत्र लागू असलेल्या जात प्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्तीपुर्वी सादर करणे प्रकरणपरत्वे अनिवार्य राहील.

७. सामान्य प्रशासन परिपत्रक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक ०१ जुलै, २००५ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नियम-२००५ नुसार) प्रतिज्ञापत्र भरणे बंधनकारक राहील.

८. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. विसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब. दिनांक १२ डिसेंबर, २०११ मधील तरतूदीनुसार सरळसेवा भरतीमध्ये ज्या उमेदवारांची निवड विशिष्ट मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे, अशा उमेदवारास नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ०६ महिन्याच्या आत जात तपासणी वैधता प्रमाणपत्र सादर करावे लागेल. जात पडताळणी समितीने त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर त्यांना दिलेले नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येतील.

९. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वधारण शर्ती व अटी) तसेच इतर नियम जे शासकीय सेवेत प्रवेश करतांना लागू असतात तसेच वेळोवेळी होणाऱ्या दुरुस्त्या नियुक्त झालेल्या उमेदवाराला बंधनकारक राहील.

१०. नेमणुकीपूर्वी कोठेही शासकीय अथवा निमशासकीय सेवेत नसल्यबाबतचे स्वतःचे प्रमाणपत्र रुजू होतांना कार्यालयास सादर करावे लागेल.

११. महाराष्ट्र शासन, निर्णय कः अंनियो-१००१०/१२१/रोगा-४, दि.३१.१०.२००५ चे शासन निर्णयानुसार जे उमेदवार शासकीय आस्थापनेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यांनतर नियुक्त अशा उमेदवारांना १ नोव्होबर २००५ रोजी किंवा त्यांनतर शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यास" नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना" लागू राहील, सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना महणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ आणि सद्या अस्तित्वात असलेली भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

१२. नियुक्ती स्विकारल्यानंतर, पदाचा राजीनामा द्यावयाचा असेल, तर तशी लेखीसूचना एक महिना आगावू नियुक्ती कार्यालयास द्यावी लागेल. अन्यथा त्यांना मिळत असलेल्या एक महिन्याच्या मुळ वेतनाएवढी रक्कम शासन कोषागारात भरणा करणे बंधनकारक राहील. सदरहू रकमेचा भरणा शासन कोषागारात केल्याशिवाय त्यांना कार्यमुक्त केले जाणार नाही.

१३. नियुक्तीचे आदेशाचे दिनांकापासून ३० दिवसाचे आत रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा नियुक्तीबाबतचा हक्क रद्द समजण्यांत येऊन हे आदेश आपोआपच रद्द होईल.

१४. नियुक्तीच्या पदावर रुजू होते वेळी आपण धारण केलेली शैक्षणिक अर्हता, जन्म दिनांक व तद्नुषंगाने आवश्यक कागदपत्रे मुळ प्रतीत विभागास सादर करणे अनिवार्य राहील.

१५. नियुक्ती संदर्भात भविष्यात न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास, न्यायालयाचे निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल व ती संबधितास बंधनकारक राहील.

१६. नियुक्त उमेदवाराची बदली पदांच्या उपलब्धतेनुसार शासन हितार्थ महाराष्ट्र राज्यामध्ये कोठेही केव्हाही बदली होवू शकते.

१७. प्रथम नियुक्तीच्या पदावर हजर होताना त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता व इतर भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

१८. नियुक्ती दिलेल्या कार्यालयाने पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू करुन घेताना आवश्यक त्या अटी व शर्तीचे तसेच आवश्यक प्रमाणपत्रांची पुर्तता करून घेणे तसेच उमेदवाराचे अर्हतेसंबंधीत व इतर आवश्यक मुळ दस्ताऐवज पडताळणी करुन व सर्व आवश्यक मुळ प्रमाणपत्राची योग्यता तपासून शासन निर्णयानुसार खातर जमा करुनच संबंधितांना सेवेत रुजू करुन घेण्याची दक्षता घ्यावी.

१९. शासनाने संदर्भांकित दि.२७.०७.२०२६ अन्वये पुनर्जिवित केलेल्या शिपाई गट-ड पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्ती केलेल्या कर्मचाऱ्याच्या पदोन्नती, सेवानिवृत्तीने अथवा इतर कारणामुळे सदर पद रिक्त झाल्यावर ते नियमित आपोआप पद व्यपगत होईल.

२०. याप्रित्यर्थ होणारा खर्च मागणी क्र. डी-०६, २४०५ मत्स्यव्यवसाय, ००१ संचालक व प्रशासन, (००)(०२) जिल्हा कार्यालये, २४०५००३९ (अनिवार्य) या लेखाशिर्षाखाली ०१ - वेतन या लेखाशिर्षाखाली विहित पध्दतीने निधी अर्थसंकल्पित करुन, संबंधित वित्तिय वर्षात मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदरचे आदेश त्वरित अंमलात येतील.

Digitally signed by
PRERNA DESHBHRATAR
Date: 30-07-2026
18:56:59

आयुक्त मत्स्यव्यवसाय,
महाराष्ट्र राज्य मुंबई

**प्रति,**

श्री. कौशिक सुरेश परटक्के, जैन मंदिर वार्ड, कोठारी भवन समोर मु.पो. हिंगणघाट जि. वर्धा

**प्रत :-**

१. सहआयुक्त मत्स्यव्यवसाय (भुजल)/ (सागरी) /(निपास), आयुक्तालय, मुंबई

२. प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नागपूर

३. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, वर्धा

४. अधिदान व लेखा कार्यालय, बांद्रा, मुंबई

५. कोषागार/ उपकोषागार कार्यालय, नागपूर/ वर्धा

६. कार्यासन अधिकारी, का.क्र.१३,१४,१५ (गो.अ./ से.पु./रिक्तपद/बिं.ना./नि.लि./आ.धा.)

**प्रतिलिपी :-**

उपसचिव (मत्स्य) कृषि व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसतव.

**प्रति,**

सर्व कार्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, उपरोक्तप्रमाणे नियुक्त झालेल्या उमेदवारांचे नाव संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सामाईक प्रतिक्षा सुचीमधून वगळण्याबाबत आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे.